N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** छत्रपती संभाजीनगर शहर **P.S.(ठाणे):** वेदांत नगर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0090 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**30/04/2025 17:50

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 22/04/2025
**Date To ( दिनांक पर्यंत):** 25/04/2025
**Time From (वेळेपासून):** 00:00 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 00:00 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 30/04/2025 **Time (वेळ):** 17:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 011

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 30/04/2025 17:19 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 3 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** कार्यकारी अभियंता,जागतीक बँक प्रकल्प विभाग , स्नेह नगर, छ संभाजीनगर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): पोलीस उप अधिक्षक गोरखनाथ पोपट गांगुर्डे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1967

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी नं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,छसंभाजीनगर,छत्रपती संभाजीनगर शहर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,छसंभाजीनगर,छत्रपती संभाजीनगर शहर, महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9503736351

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अभियंता श्री वसिम देशमुख | | | 1. जागतीक बँक प्रकल्प विभाग, स्नेह नगर,,छसंभाजीनगर, छत्रपती संभाजीनगर शहर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | कार्यकारी अभियंता श्री एम.एम.आजमी | | | 1. जागतीक बँक प्रकल्प विभाग, स्नेह नगर,,, छ संभाजीनगर, छत्रपती संभाजीनगर शहर, महाराष्ट्र,भारत |



Scanned with OKEN Scanner

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)** (चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11. **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद दिनांक :- 30 /04/2025.

मी गोरखनाथ पोपट गांगुर्डे वय 58 वर्ष, धंदा नौकरी, पोलीस उप अधिक्षक ,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग छ. संभाजीनगर मो.9503736351

सरकार तर्फे फिर्यादी होवुन फिर्याद देतो की, दि.15/04/2025 रोजी तक्रारदार भुषण सोळुंके व त्याचा मित्र चेतन जगताप असे लाप्रवि छ.संभाजीनगर येथे येवुन पोलीस निरीक्षक श्री.वाल्मीक कोरे यांना भेटले होते. पोनि वाल्मीक कोरे यांनी तक्रारदार व त्यांचा मित्र चेतन जगताप यांची मा.पोअ सो यांचेसोबत भेट घालुन दिली असता तक्रारदार यांची एका लोकसेवका विरुध्द लाच मागणी बाबत तक्रार असल्याचे सांगीतले होते. मा.पोअ. यांनी पोनि वाल्मीक कोरे यांना तक्रारदार श्री भुषण सोळुंके यांचे तक्रारी वरुन सापळा कारवाई करण्याच्या सुचना दिल्या होत्या त्यानंतर तक्रादार यांनी पोनि वाल्मीक कोरे यांना कळविले की आलोसे हे दि.21/05/2025 किंवा 22/04/2025 रोजी संपर्क करुन मला भेटायला बोलावतील असे सांगुन तक्रारदार निघुन गेले होते. त्यानंतर पोनि कोरे यांनी दिनांक 21/04/2025 रोजी पंच मिळणे बाबत रितसर पत्र दिले होते.

त्यानंतर दि.22/04/2025रोजी तक्रारदार श्री भुषण सोळुंके यांना आलोसे यांनी भेटण्यास बोलावले असता त्यांनी पोनि कोरे यांना कळविले होते. पोनि कोरे यांच्या सांगणेवरुन दोन पंच व सापळा पथक असे सापळ्यासाठी लागणारे साहीत्य सह खाजगी वाहनात बसुन 10.00 वा.रेल्वेस्टेशन येथील मोकळ्या मैदान येथे पोहचले होते. सदर ठिकाणी पोनि कोरे यांनी तक्रारदार श्री.भुषण सोळुंके, दोन पंच, आणि सापळा पथकातील अधिकारी कर्मचारी यांची ओळख पटवुन त्याठिकाणीच तक्रारदार श्री भुषण सोळुंके यांची लेखी तक्रार नोदंवुन घेतली.

तक्रारदार नामे श्री भुषण वेडुसिंग सोळुंके वय 38 वर्षे धंदा -व्यापार रा.भारतमाता नगर हडको, एन 12 छत्रपती संभाजीनगर यांनी तक्रार दिली ती पुढील प्रमाणे मी वरील ठीकाणी कुटंबासह राहत असुन बांधकाम व्यवसाय करतो त्यावर कुटुंबाचा उदर निर्वाह चालतो " माझी आई नामे मिरा वेडुसिंग सोळुंके हिला भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लिमीटेड यांचे कडुन गाव चापानेर ता.कन्नड जि.छत्रपती संभाजीनगर या ठिकाणी पेट्रोलपंप मंजुर झाला आहे. सदरचा पेट्रोल पंप तिला तिचे माहेरचे नाव मिरा रामकृष्ण चव्हाण या नावे मंजुर झाला आहे. सदरचा पेट्रोल पंप पुर्णत्वास नेणेसाठी वेगवेगळया शासकिय कार्यालयांच्या ना-हरकत प्रमाणपत्र आवश्यक असते. दिनांक 19/10/2024 रोजी टेरेटरी मॅनेजर रिटेल जळगाव भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लिमीटेड यांचे कडुन मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी कार्यालय छत्रपती संभाजीनगर यांना एकुण 07 कार्यालयात ना-हरकत प्रमाणपत्र देण्याकरीता प्रस्ताव पाठविण्यात आला होता. सदर प्राप्त प्रस्तावावरुन जिल्हाधिकारी कार्यालय यांनी दिनांक 09/12/2024 रोजी मा.कार्यकारी अभियंता, जागतीक बँक प्रकल्प विभाग, छ.संभाजीनगर यांना पत्र देवून गट क्र.5 भाग मौजे चापानेर ता.कन्नड जि.छ.संभाजीनगर यांना चौकशी करुन अहवाल सादर करण्यास नमुद केले



Scanned with OKEN Scanner

होते सदर पत्रावरील कार्यकारी अभियंता, जागतीक बँक प्रकल्प विभाग, छ.संभाजीनगर यांची दिनांक
11/12/2024 रोजीची पोहोच माझ्याजवळ आहे.
माझी आई मिरा चव्हाण या वयोवृध्द झाले असुन त्यांना पेट्रोलपंपासाठी आवश्यक ना-हरकत प्रमाणपत्र घेणेसाठी धावपळ होत नाही म्हणुन त्यांनी मी त्यांचा मुलगा असल्याने मला ना-हरकत प्रमाणपत्र आणि इतर कार्यालयातील पेट्रोल पंप संदर्भातील अधिकार बहाल केले आहेत.
सदर पेट्रोल पंपाच्या ना-हरकत प्रमाणपत्राचा प्रस्ताव हा कार्यकारी अभियंता, जागतीक बँक प्रकल्प विभाग, छ. संभाजीनगर यांचे कडे मागील सहा महीन्यांपासुन प्रलंबित आहे. सदर कार्यालयातील अभियंता वसीम देशमुख हे ना-हरकत प्रमाणपत्र देणेसाठी दि.15/04/2025 रोजी त्यांचा मोबाईल क्र.9421401786 यावर झालेल्या संभाषणामध्ये ना-हरकत प्रमाणपत्रासाठी काही तरी पैसे दयावे लागतील असे सांगुन पैशाची मागणी करुन प्रत्यक्ष भेटुन बोलु असे सांगीतले सदर बोलण्याचे वेळी मी तुमच्याशी न बोलता चेतन जगताप यांचेशीच बोलेल असे सांगीतले.
मी पुन्हा सदर पेट्रोल पंपाच्या ना-हरकत प्रमाणपत्र करीता अभियंता वसीम देशमुख यांची दि.21/04/2025 रोजी भेट घेण्यास मोबाईलवर संपर्क साधला असता त्यांनी कळविले की तुम्ही नविन माणुस आहे माझ्यासाठी, तुमच्या सोबत काय बोलु, यावरुन माझ्या लक्षात आले की, माझा मित्र चेतन जगताप यास माझ्या सोबत त्यांच्या भेटीला घेतल्याशिवाय ना-हरकत प्रमाणपत्राचे कामा बाबत किंवा लाचेच्या मागणी बाबत अभियंता श्री देशमुख काही बोलणार नाहीत. त्यामुळे मी दिनांक 22/04/2025 रोजी 12.30 वा चे सुमारास अभियंता देशमुख यांचे कार्यालयात त्यांनी फोनवर सांगीतल्याप्रमाणे मित्र चेतन जगताप यांस सोबत घेवून भेटण्यास जाणार आहोत. सदर भेटीत चेतन जगताप हा माझ्यासोबत असणार आणि तो माझ्यावतीने बोलण्यास हजर राहणार आहे. चर्चेदरम्यान ना-हरकत प्रमाणपत्रासाठी पैशाची मागणी करतील अशी शक्यता आहे. तरी त्यांचेवर लाचमागणी पडताळणी होवून सापळा कारवाई होणेस विनंती आहे. " वगेरे मजकुराची तक्रार दिल्याने ती नोंदविण्यात त्यावर तक्रारदार , पोनि कोरे व पंचानी सहया केल्या आहेत.
त्यानंतर पंच क्र.1 सुनिल कदम, तक्रारदार व त्यांचा मित्र चेतन जगताप असे तक्रारदार यांचे कार क्रमांक MH20 GV 0030.ने आलोसे श्री वसिम देशमुख यांना भेटण्यासाठी जातील व आलोसे यांनी पंचाबाबत विचारणा केल्यास समयसुचकतेने उत्तरे देण्यास पोनि कोरे यांनी सांगितले.त्यानंतर पोह जोशी यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन तक्रारदार यांचे गळयात अडकवुन, पंच क्र.1 सुनिल कदम व मित्र जगताप यांना कार क्र MH20 GV 0030 ने 12-30 वा.रवाना केले. तक्रारदार हे स्नेहनगर येथील कार्यालयाकडे जात असताना आलोसे श्री देशमुख यांनी फोनद्वारे तक्रारदार यांना कळविले की,स्नेहनगर येथील ऑफीस मध्ये काम चालु आहे. तुम्ही भेटण्यास सार्वजनिक बांधकाम विभाग पश्चिम कार्यालय, पदमपुरा छ.संभाजीनगर येथे या तेथे आपण भेटु असे सांगीतले. त्यामुळे तक्रारदार त्यांचा मित्र चेतन जगताप व पंच क्र.1 कदम असे पदमपुरा कार्यालया समोर गेले असता कार्यालयाच्या खाली असलेल्या झाडाजवळ अभियंता श्री.वसीम देशमुख यांची भेट झाली. सदर वेळी तक्रारदार, त्यांचा मित्र चेतन जगताप व अभियंता श्री.देशमुख यांचे मध्ये पंच क्र.1 सुनिल कदम यांचे समक्ष झालेल्या चर्चेनंतर 13:40 वा. ते गोपनिय ठिकाणी परत आले. पो.हवा/जोशी यांनी तक्रारदार यांचे गळयातील व्हाईस रेकॉर्डर काढुन बंद केला. त्यानंतर पोनि कोरे यांनी पंच क्र.1 श्री कदम यांना अभियंता श्री देशमुख यांचे सोबत झालेल्या भेटीत काय घडले याबाबत विचारणा केली असता त्यांनी सांगीतले की, अभियंता श्री वसिम देशमुख यांनी, पेट्रोलपंपाच्या नाहरकत प्रमाण पत्र देण्यासाठी स्वत:सह त्यांचे वरिष्ठ अधिकारी आजमी साहेब यांना 50,000 /- रुपये दयावे लागतील परंतु आज आजमी साहेब हे रजेवर असुन ते आल्यावर समोरा समोर भेट घालुन देतो असे सांगीतले. त्यावरुन पोनि कोरे यांनी रेकॉर्डर मधील रेकॉर्डींग हेडफोन लावुन ऐकुन तक्रारदार यांचेकडे अभियंता श्री देशमुख यांनी पैशाची मागणी केल्याची खात्री केली. तसा लाचमागणी पडताळणी पंचनामा दिनांक 22/04/2025 रोजी करण्यात आला परंतु श्री वसिम देशमुख यांचे वरिष्ठ अधिकारी श्री आजमी हे कार्यालयात हजर नसल्यामुळे पुन्हा लाचमागणी पडताळणी करण्याचा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला होता.मुळ तक्रार व दिनांक 22/04/2025 चा लाचमागणी पडताळणी पंचनामा मी वाचुन पाहीला आहे.
त्यांनतर दिनांक 24/04/2025 रोजी अभिकथीत लोकसेवक श्री वसिम देशमुख यांनी तक्रारदार श्री भुषण सोळुंके यांना मोबाईल द्वारे संपर्क साधुन त्यांचे वरिष्ठ अधिकारी श्री आजमी हे कार्यालयात कर्तव्यावर हजर असल्याचे सांगुन भेटीसाठी बोलावले असे पोनि कोरे यांना तक्रारदार यांनी कळविले. त्यावेळी मला पोनि कोरे यांनी सापळा पथकासह रेल्वेस्टेशन जवळील मोकळ्या मैदानात येण्यास सांगीतले. मी सापळा पथकाराह सदर ठिकाणी गेलो असता पोनि कोरे यांनी माझी तक्रारदार, पंच यांचेसोबत ओळख पटवुन दिनांक 15/4/2025 रोजी पासुन ते अदयापपावेतो सापळा कारवाईत झालेला इतिवृत्तांत समजावुन सांगीतला. सदर ठिकाणी तक्रारदार यांनी आम्हास सर्व हकीगत



Scanned with OKEN Scanner

सांगीतली त्यामुळे आज पुन्हा लाचमागणी पडताळणीचा निर्णय सर्वानुमत घेण्यात आला त्यानंतर पोनि कोरे यांनी तक्रारदार यांना पुन्हा सुचना देवुन पंच क्र.1 सुनिल कदम असे कार क्रमांक MH20 GV 0030 ने आलोसे श्री देशमुख, आणित्यांचे वरिष्ठ अधिकारी श्री आजमी यांची भेट घेण्यास सांगीतले. तसेच आलोसे यांचेशी आपले कामा संबधाने पुन्हा चर्चा करावी व त्यांनी पंचा बाबत विचारणा केल्यास समयसुचकतेने उत्तरे देण्यास सांगितले.पोह जोशि यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन तक्रारदार यांचे गळयात अडकवुन तक्रारदार व पंचास तक्रारदार यांचे कार क्र. MH20 GV 0030 ने 17:15 वा.रवाना केले .
तक्रारदार हे पंचास घेवुन छ.संभाजीनगर येथील स्नेहनगर मधील कार्यकारी अभियंता, जागतीक बँक विभाग, येथे जावुन अभियंता श्री वसिम देशमुख व त्यांचे वरिष्ठ अधिकारी श्री आजमी यांचेशी चर्चा करुन 17:48 वा.गोपनिय ठिकाणी परत आले.पो.हवा/जोशी यांनी तक्रारदार यांचे गळयातील व्हाईस रेकॉर्डर काढुन बंद करुन पोनि कोरे यांनी पंच क्र.1 कदम यांना स्नेहनगर येथील जागतीक बँक विभाग.,कार्यालयात काय घडले याबाबत विचारणा केली असता पंच क्र.1 यांनी कळविले की, कार्यालयातील अभियंता श्री वसिम देशमुख व वरिष्ठ अधिकारी आजमी यांची भेट झाली असुन पेट्रोलपंपाच्या नाहरकत प्रमाण पत्र साठी श्री देशमुख यांनी स्वत:साठी आणि त्यांचे वरिष्ठ अधिकारी श्री आजमी यांचे करीता 40,000 /- रुपयाची मागणी केली. त्यानंतर ते तक्रारदार यांना त्यांचे वरिष्ठ अधिकारी श्री आजमी यांचे कडे घेवुन गेले. श्री आजमी यांना तक्रारदार यांचे पेट्रोलपंपाच्या नाहरकत प्रमाणपत्रासाठी बोलणी झाल्याचे सांगुन तक्रारदार यांनी श्री.आजमी यांना चाळीस हजार रुपये सांगीतले असे उददेशुन सांगीतले. तक्रारदार, अभियंता वसीम देशमुख यांचे दरम्यान झालेले लाचेची बोलणी ही आजमी यांचे समक्ष त्यांच्या केबीनमध्ये केली आहे.सदर वेळी श्री आजमी यांनी तक्रारदार यांना कोणतीही प्रक्रीया अथवा उलट उत्तर केलेले नाही ते शांतपणे चालु संभाषण ऐकत होते. त्यावरुन पोनि कोरे यांनी रेकॉर्डर मधील रेकॉर्डींग हेडफोन लावुन ऐकली व पंचाना व तक्रारदार यांना सांगितले की, " श्री वसिम देशमुख यांनी स्वत:सह त्यांचे वरिष्ठ अधिकारी श्री आजमी यांचे करीता 40,000 रुपयाची मागणी करीत आहे ही खात्री केली तसा लाचमागणी पडताळणी पंचनामा दिनांक 24/04/2025 रोजी करण्यात आला. त्यानंतर तक्रारदार यांना लाचेची रक्कम हजर करण्यास सांगीतले असता मी उद्ईक दि. 25/04/2025 रोजी माझे बांधकामाचे पैशातुन लाचेची रक्कम हजर करीन असे तक्रारदार यांनी सांगीतले होते. दि.25/04/2025 रोजी सापळा कारवाई आजमावण्याच्या दृष्टीने तक्रारदार, दोन पंच व माझ्यासह सापळा पथक असे एन-12 येथील गोपनीय ठिकाणावर जमा झालो.सदर सापळा कारवाई करीता सोनी कं.चा व्हॉईस रेकॉर्डर व नवीन मेमरी कार्ड वापरण्यात येणार असल्याचे सांगितले.तसेच सापळा कारवाईसाठी ठरलेल्या 40,000 रु.च्या लाचरक्कमे बाबत विचारणा केली असता सदरची रक्कम बांधकामाचे पैशातुन आणली असे सांगुन ती समक्ष हजर केली. पोनि कोरे यांचे सुचने वरुन पंच क्र.2 शिवम घोडके यांनी 500 रु.किंमतीच्या असलेल्या 80 नोटांचे क्रमांक लिहुन तो कागद स्वत:कडे ठेवला. त्यानंतर पोहवा/जिवडे यांनी सदर नोटांना ऍन्थ्रासिन पावडर लावुन त्या नोटा तक्रारदार यांचे पॅन्टच्या उजव्या बाजुच्या खिशात ठेवल्या. तसेच आलोसे यांनी लाचेची रक्कम मागणी केल्याखेरीज त्या नोटा हाताळु नये, मागणी करताच ती खिशातुन काढुन देण्याच्या सुचना दिल्या. सदरची लाचरक्कम आलोसे यांनी स्विकारल्यानंतर तक्रारदार यांनी पोनि कोरे यांच्या मोबाईल क्रमांक 9623565310 यावर संपर्क साधुन एक डजन आंबे घेवुन या अशी इशा-याचे वाक्य बोलण्य

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

PRAVINA TARACHAND YADAV(I (Inspector)) / PI or (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): No.(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):



Scanned with OKEN Scanner

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

डि. ओ. अधिकारी
वेदांत नगर पोलीस ठाणे
औरंगाबाद शहर

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): PRAVINA TARACHAN
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PI



Scanned with OKEN Scanner

बोलण्याची तक्रारदार यांना सुचना दिली. सदर सापळा कारवाईत रेकॉर्डर पोहवा/ जोशी हाताळणार असल्याचे सागुंन त्यांनी दुपारी 15-37 वा.च्या सुमारास व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन गळयात अडकवुन दिला. पंच क्र.1 श्री सुनिल कदम यांना सोबत घेवुन स्नेहनगर येथे कारने रवाना झाले. त्यांचे पाठोपाठ माझ्यासह पोनि कोरे ,पोहवा/ जोशी व पंच क्र.2) शिवम घोडके असे खाजगी वाहनाने आले. स्नेहनगर येथील कार्यकारी अभियंता,जागतीक बॅक प्रकल्प विभाग, यांचे कार्यालयात जावुन काही वेळाने तक्रारदार व पंच क्र 1 असे 16.10 वा.चे सुमारास कार मध्ये बसुन नियोजीत ठिकाणी आले त्यांचे पाठोपाठ आम्ही सापळा पथकासह परत आलो.त्या ठिकाणी तक्रारदार व पंच क्र.1 श्री कदम यांना पोनि कोरे यांनी लाचस्विकारणे बाबत विचारले असता तक्रारदार व पंच क्र.1 यांनी पोनि श्री कोरे यांना सांगीतले की, अभियंता श्री वसिम देशमुख व त्यांचे वरिष्ठ अधिकारी श्री आजमी हे कार्यालयात हजर नव्हते.त्या ठिकाणी हजर असलेले कर्मचारी श्री खैरे यांनी तक्रारदार यांचे ताब्यात पेट्रोलपंपाची नाहरकत प्रमाणपत्रचा कागद दिला आहे. त्या कागदावर तक्रारदार यांनी सही करुन त्याची पोच दि.28/04/2025 रोजीची दिली आहे. अभियंता श्री वसिम देशमुख आणि त्यांचे वरिष्ठ अधिकारी श्री आजमी यांना तक्रारदार यांचेवर संशय आला म्हणुन ते कार्यालयात हजर न राहता त्यांना ना हरकत प्रमाण पत्र देण्यात आले आहे.सबब ते आता तक्रारदार यांचे कडुन लाचेची रक्कम स्विकारणार नाही अशी तक्रारादार श्री भुषण सोळुंके दोन्ही पंच व पोनि कोरे व आमची खात्री झाली आहे.

तरी दिनांक 22/04/2025 ते दि.25/04/2025 रोजीचे दरम्यान अभिकथीत लोकसेवक अभियंता श्री वसिम देशमुख यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग पश्चिम कार्यालय पदमपुरा छ.संभाजीनगर व कार्यकारी अभियंता कार्यालय, जागतीक बॅक प्रकल्प विभाग,स्नेहनगर या ठिकाणी पेट्रोल पंपाच्या ना हरकत प्रमाण पत्र देण्यासाठी स्वत:सह व त्यांचे वरिष्ठ अधिकारी श्री आजमी यांच्या करीता 50,000/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती 40,000/- रुपये स्विकारण्याचे मान्य केले होते.तसेच वरिष्ठ अधिकारी श्री आजमी यांचे समक्ष श्री देशमुख हे तक्रारदार यांचे सोबत लाचेची बोलणी करीत असताना, श्री आजमी यांनी अभियंता श्री देशमुख यांना कोणताही प्रतिबंध न घालता एक प्रकारे लाचेस प्रोत्साहन दिले आहे. सबब माझी अभियंता श्री वसिम देशमुख यांचे विरोधात कलम 7, 7 (अ) तर त्यांचे वरिष्ठ अधिकारी श्री एम.एन.आजमी यांचे विरोधात कलम 12 भ्र.प्र.अधिनियम 1988 प्रमाणे कायदेशीर फिर्याद आहे.म्हणुन मा.पो.नि.सो यांच्या आदेशाने गुन्हा दाखल करुन पुढील तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग छत्रपती संभाजीनगर पो.नि.सो वाल्मिक कोरे यांच्याकडे देण्यात आला

ड्युटी ऑफिसर
पो.स्टे.वेदांतनगर
छत्रपती संभाजीनगर (शहर)

Scanned with OKEN Scanner